महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.
E-mail:excisedycomntp@gmail. Com. Tel. २२६६३६८५.

# परिपत्रक

वाचले :- १) मुंबई मोहाफुले नियम, १९५०.
२) शासन परिपत्रक क्र. १०७७/२९ पीआर, दि. २९/१०/१९७७.
३) शासन अधिसुचना, गृह विभाग क्र. बीपीए-०७१६/प्र.क्र.१५०/राउशु-२, दि.१०/०४/२०१८.
४)शासन अधिसुचना, गृह विभाग क्र. एमएफएल-०२२१/प्र.क्र.२५/राउशु-२, दि.०३/०५/२०२१.
५) शासन निर्णय क्र. एमएफएल ०२२१/प्र.क्र.२५/राउशु-२, दि. ०४/०५/२०२१

विषय :- मोहाफुलांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांचे सशक्तीकरण करण्यासाठी नेमलेल्या खारगे समितीच्या अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने, मोहाफुलांवर सद्य:स्थितीत महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ या कायद्यात असलेले निर्बंध शिथिल करण्याबाबत.

क्र. मोह २०१५/अकरा मुंबई, दि. ११ मे, २०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, मोहाफुलांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांचे सशक्तीकरण करण्यासाठी नेमलेल्या खारगे समितीच्या अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने, मोहाफुलांवर सद्य:स्थितीत महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ या कायद्यात असलेले निर्बंध शिथिल करण्याबाबत उपरोक्त वाचले मधील अनुक्रमांक ५ मध्ये नमुद शासन निर्णय तसेच अधिसूचनेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत:-

१) राज्यांतर्गत मोहाफुलांची खरेदी, गोळा करणे व वाहतुक यावरील निर्बंध दि. ०३/०५/२०२१ पासून उठविण्यात आले असून मोहाफुले जमा करण्याचा नमुना एमएफ-३ परवाना, मोहाफुले खरेदी करण्याचा नमुना एमएफ-४ परवाना व मोहाफुले वाहतूकीचा नमुना एमएफ-५ परवाना बाबतच्या मुंबई मोहाफुले नियम, १९५० मधील तरतुदी रद्द करण्यात आल्या आहेत. यापुढे नमुना एमएफ-३, नमुना एमएफ-४ व नमुना एमएफ-५ परवाना मंजूर करण्याबाबत **कार्यवाही करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी**.

२) मोहाफुलांच्या परराज्यातून होणाऱ्या आयातीवर असलेले निर्बंध शासनाने तसेच कायम ठेवले आहेत. तसेच नमुना एमएफ-६ मधील आयात परवान्याची तरतूद सुध्दा कायम आहे. तथापि सद्यस्थितीत नमुना एमएफ-६ परवाना **मंजूर करु नये.**

३) मोहाफुलांच्या परराज्यातील निर्यातीचे धोरण खुले राहील. मात्र त्यासाठी निर्यात परवाना मंजुर करून घेणे आवश्यक राहील. त्यामुळे नमुना एमएफ-७ मधील परवाना तसाच कायम आहे याची कृपया नोंद घ्यावी.

४) मोहाफुले साठवणूक, विक्री व व्यापार करण्याकरिता एमएफ-२ अनुज्ञप्ती नवीन मंजुर करण्यावर वाचले मधील अनुक्रमांक २ अन्वये निर्बंध आहेत. खाजगी व्यक्तीबाबत सदरचे निर्बंध कायम ठेवण्यात आले

आहेत. खाजगी व्यक्तींच्या नावे मंजुर असलेला नमुना एमएफ-२ अनुज्ञप्त्यांचा वार्षिक विक्री कोटा आत्ता सिमित करण्यात आला आहे. ज्या एमएफ-२ अनुज्ञप्तींचा वार्षिक विक्री कोटा सध्या ५०० क्विंटलपेक्षा जास्त आहे, त्यांचा कोटा या मर्यादेपर्यंत कमी करण्यात यावा व ज्यांचा कोटा ५०० क्विंटलपेक्षा कमी आहे त्यांचा कोटा आहे तेवढाच मर्यादीत करावा. यापुढे खाजगी व्यक्तींच्या नमुना एमएफ-२ च्या विक्री कोटयात **वाढ करू नये.** सर्व संबंधित जिल्हा अधीक्षकांनी या सूचना जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून खाजगी व्यक्तींच्या नावे असलेल्या सर्व एमएफ-२ अनुज्ञप्तीवरील वार्षिक विक्री कोटा शासनाने विहीत केलेल्या मर्यादेपर्यंत करण्याची कार्यवाही तातडीने पुर्ण करावी.

५) खाजगी व्यक्तींच्या नावे कार्यरत असलेल्या एमएफ-२ अनुज्ञप्ती ज्या अनुज्ञप्तीधारकाच्या नावे असतील तो अनुज्ञप्तीधारक मयत झाल्यास त्याच्या वारसाला सदर एमएफ-२ अनुज्ञप्ती **वर्ग करण्यात येऊ नये.**

६) वाचले मधील अनुक्रमांक ५ वरील शासन निर्णयातील अनुक्रमांक ५ व ६ च्या अनुषंगाने आदिवासी क्षेत्रात संस्थात्मक नमुना एमएफ-२ अनुज्ञप्ती देण्याबाबतच्या सूचना सर्व अधीक्षकांनी अवलोकन करुन जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणाव्यात तसेच अनुज्ञप्ती मंजुरीपूर्वी मुंबई मोहाफुले नियम, १९५० मधील नियम २ (सी) नुसार मान्यताप्राप्त संस्थांबाबत आयुक्तांची मान्यता **घेणे बंधनकारक आहे.**

७) आदिवासी क्षेत्रात नवीन नमुना एमएफ-२ अनुज्ञप्ती मंजुर करताना मान्यताप्राप्त संस्थांबाबत (आदिवासी विकास संस्था, महिला बचत गट, सहकारी संस्था व ग्रामपंचायत) आयुक्तांची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करताना पुढील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे:-

अ) सदर संस्था आदिवासी क्षेत्रात कार्यरत असणे आवश्यक आहे.

आ) संस्थेत पुर्णत: आदिवासी किंवा आदिवासी बहुल सदस्य आवश्यक राहतील.

इ) सदर संस्था आदिवासी बहुल असल्याबाबत पुरावा.

ई) संस्थेचा उद्देश मोहाफुलांच्या वापरापासून पौष्टिक पदार्थ, जनावरांचे खाद्य करणे किंवा तत्सम वापर इत्यादी बाबींचा पुरावा.

उ) अर्जदार ग्रामपंचायत असल्यास त्याबाबत ग्रामसभा ठरावाची आवश्यकता राहील.

ऊ) अशा संस्थेस मोहाफुलांच्या विक्रीबाबत एमएफ-२ व वापरासाठी एमएफ-१ नमुन्यातील अनुज्ञप्ती आवश्यक राहील. त्यांच्या कोटयाबाबत निर्बंध राहणार नाहीत.

८) ज्या आसवनीला मोहाफुलांचा वापर उर्ध्वपतनासाठी करावयाचा आहे, त्या आसवनीच्या अनुज्ञप्तीवर मोहाफुलांपासून उर्ध्वपतनाची परवानगी असल्याची नोंद आवश्यक आहे, अशी नोंद असल्यास अशा आसवनीस मोहाफुले वापरासाठी नमुना एमएफ-१ अनुज्ञप्ती मंजुरीवर कोणतेही निर्बंध नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. तसेच इतर वापरासाठी नमुना एमएफ-१ अनुज्ञप्ती मंजुरीवर कोणतेही निर्बंध नाहीत.

९) मुंबई मोहाफुले नियम, १९५० मधील नियम ७-अ नंतर नियम ७-ब समाविष्ट करण्यात येत असून त्यानुसार नियम ५ अंतर्गत मंजूर केलेली अनुज्ञप्ती ही जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या मान्यतेने जिल्हयाच्या इतर जागी स्थलांतरीत करता येईल.

१०) मोहाफुलांचा वापर करण्याकरिता मोहाफुले बाळगण्यासाठी अनुज्ञप्ती शुल्काचे प्रमाण व मोहाफुले विक्री करण्याकरिता अनुज्ञप्ती शुल्काचे प्रमाण याबाबत वाचले मधील अनुक्रमांक ४ वरील अधिसुचनेतील अनुसूचीनुसार दरात सुधारणा करण्यात आली आहे. यापुढे मंजूर होणाऱ्या व पुढील नुतनीकरणावेळी अनुज्ञप्ती शुल्काची सुधारीत दरानुसार आकारणी करावी.

११) मोहाफुले गोळा, खरेदी व वाहतुक यावरील निर्बंध शासनाने कमी केल्यामुळे मोहाफुलांचा अवैध मद्य निर्मितीसाठी होणाऱ्या वापरात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत सर्व विभागीय उप आयुक्त व अधीक्षक यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी आवश्यक दक्षता घेऊन मोहाफुलांचा गैरवापर होणार नाही, याबाबत सर्वतोपरी काळजी घ्यावी.

उपरोक्त शासन निर्णय, शासन अधिसूचना तसेच वरील निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही बिनचूकपणे करावी. सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास तीन महिन्यात सादर करावा.

या परिपत्रकाची पोहोच देण्यात यावी.

( कांतीलाल उमाप )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी
२) सर्व विभागीय उप आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क

प्रत,

१) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
२) या कार्यालयातील कार्यासन क्र. ८ व १२ (५ प्रती)

२७/५

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ७, अंक ५६] मंगळवार, मे ४, २०२१/वैशाख १४, शके १९४३ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १२१

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ मे २०२१.

### अधिसूचना

क्रमांक एमएफएल. ०२२१/प्र.क्र.२५/राऊशु-२.—ज्याअर्थी, मुंबई मोहाफुले नियम, १९५० यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा पंचवीस) च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धी शिवाय हे नियम तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, कलम १४३ च्या पोट-कलम (२) मधील खंड (ब) आणि (क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, मुंबई मोहाफुले नियम, १९५० यात सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, मुंबई मोहाफुले (सुधारणा) नियम, २०२१ असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई मोहाफुले नियम, १९५० (यापुढे ज्यांचा उल्लेख " प्रधान नियम " असा करण्यात आला आहे) नियमातील नियम ७-अ नंतर खालील नियम समाविष्ट करण्यात येत आहे.

" **७–ब.** नियम ५ अंतर्गत मंजूर केलेली अनुज्ञप्ती ही जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या मान्यतेने जिल्ह्यातील इतर जागी स्थलांतरीत करता येईल.

३. प्रधान नियमातील नियम ८ ऐवजी, खालीलप्रमाणे नियम अंतर्भूत करण्यात येत आहे.

" **८.** मोहाफुले गोळा करण्याकरिता कोणत्याही परवान्याची आवश्यकता नाही. "

४. प्रधान नियमातील नियम ९ वगळण्यात येत आहे.

५. प्रधान नियमातील नियम १० वगळण्यात येत आहे.

६. प्रधान नियमातील नियम ११ ऐवजी, खालीलप्रमाणे नियम अंतर्भूत करण्यात येत आहे.

" **११.** मोहाफुले खरेदी करण्याकरिता कोणत्याही परवान्याची आवश्यकता नाही. "

७. प्रधान नियमातील नियम १२ वगळण्यात येत आहे.

८. प्रधान नियमातील नियम १३ वगळण्यात येत आहे.

९. प्रधान नियमातील नियम १४ ऐवजी खालीलप्रमाणे नियम अंतर्भूत करण्यात येत आहे.

" **१४.** मोहाफुलाची वाहतूक करण्याकरिता कोणत्याही परवान्याची आवश्यकता नाही. "

१०. प्रधान नियमातील नियम १५ वगळण्यात येत आहेत.

११. प्रधान नियमांच्या शेवटी असलेले नमुने " एमएफ-३ ", " एमएफ-४ " व " एमएफ-५ " वगळण्यात येत आहेत.

१२. प्रधान नियमांच्या शेवटी असलेल्या अनूसूची ऐवजी खालील अनुसूची समाविष्ट करण्यात येत आहे.

**अनुसूची**

[नियम ५ चा उप-नियम (२)]

| अ. क्र. (१) | परवान्याचा उद्देश व मोहाफुलांची संख्या (२) | वार्षिक परवाना शुल्क (रुपयांत) (३) |
|---|---|---|
| १ | मोहाफुलांचा वापर करण्याकरिता मोहाफुले बाळगण्यासाठी अनुज्ञप्तीचे शुल्काचे प्रमाण | |
| | (अ) कायद्याने उर्ध्वपतनासाठी मंजूर केलेल्या आसवनी अनुज्ञप्तींसाठी जेव्हा एका वर्षात वापराचे परिमाण खालीलप्रमाणे असेल तेव्हा— | |
| | (i) १,००० क्विंटलपेक्षा जास्त नसलेले | ५,००० |
| | (ii) १,००० क्विंटलपेक्षा जास्त परंतु ५००० क्विंटलपेक्षा जास्त नसलेले | १५,००० |
| | (iii) ५००० क्विंटलपेक्षा जास्त | २५,००० |
| | (ब) कारखाना अधिनियम, १९४८ मध्ये परिभाषित केल्यानुसार अधिकृत औद्योगिक वापरासाठी | १,००० |
| | (क) अधिकृत औद्योगिक कारणासाठी इतर कोणत्याही संबंधित कारखान्यात | १,००० |
| | (ड) अधिकृत शास्त्रीय, कृषी, शैक्षणिक किंवा औषधी कारणासाठी | १,००० |
| | (ई) इतर इसमांना अधिकृत घरगुती वापरासाठी. जसे, अन्न तयार करताना किंवा पशुखाद्य निर्मितीकरिता | ५०० |
| २ | मोहाफुलांची विक्री करण्याकरिता अनुज्ञप्तीचे शुल्काचे प्रमाण. | |
| | (अ) खाजगी इसमास मोहाफुले विक्रीसाठी मंजूर केलेली अनुज्ञप्ती जेव्हा मोहाफुलांचे प्रमाण ५०० क्विंटल पेक्षा जास्त नाही. | १०,००० |

| | | |
|---|---|---|
| | (ब) मोहाफुले विक्रीसाठी मान्यताप्राप्त संस्थेस अनुज्ञप्ती मंजूर असेल तेव्हा वार्षिक विक्रीच्या परिमाणात- | |
| | (i) ५०० क्विंटलपेक्षा जास्त नाही | १०,००० |
| | (ii) ५०० क्विंटलपेक्षा जास्त आहे | १०,००० अधिक ५०० क्विंटल पेक्षा जास्तीच्या विक्रीवर रु. ५ प्रती क्विंटल दराने ” |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

युवराज ब. अजेटराव,

शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,

Mumbai 400 032, dated the 3rd May 2021.

### *NOTIFICATION*

No. MFL.0221/CR No 25/EXC-2 .—Whereas, the Government of Maharashtra considered that the following rule further to amend the Bombay Mhowra Flowers Rules, 1950, shall be brought into force at once, and therefore, the rules shall be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, 1949 (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (b) and (k) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, 1949 (XXV of 1949) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules, as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Mhowra Flowers (Amendment) Rules, 2021.

2. After rule 7-A of Bombay Mhowra Flowers Rules, 1950 (hereinafter referred to as "the Principal Rules"), the following rule shall be inserted, namely:—

" **7-B.** The licence granted under rule 5 may be allowed to shift within the same district with the approval of the Collector or the authorized officer."

3. For rule 8 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely:—

"**8.** No permit for the collection of mhowra flowers shall be required."

4. Rule 9 of the Principal Rules shall be deleted.

5. Rule 10 of the Principal Rules shall be deleted.

6. For rule 11 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely:—

"**11.** No permit for the purchase of mhowra flowers shall be required."

7. Rule12 of the Principal Rules shall be deleted.

8. Rule 13 of the Principal Rules shall be deleted.

9. For rule 14 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely:—

"**14.** No permit for the transport of mhowra flowers shall be required."

10. Rule 15 of the Principal Rules shall be deleted.

11. The forms M.F.-III, M.F.-IV and M.F.-V as appended to the principal rules shall be deleted.

12. The *Schedule* appended to the Principal Rules, the following Schedule shall be substituted, namely:—

*SCHEDULE*

[See rule 5 (2)]

| Sr. No. (1) | Purpose of the licence and quantity of Mhowra flowers (2) | Licence fee per annum (In Rupees) (3) |
|---|---|---|
| 1. | The scale of fees in respect of licences for the possession of Mhowra flowers, when Mhowra flowers are required for use- | |
| | (*a*) In distillation by distilleries licenced under the Act. When the total Quantity allowed for use during the year– | |
| | (*i*) does not exceed 1,000 quintals | 5,000 |
| | (*ii*) exceeds 1,000 quintals but does not exceed 5,000 quintals. | 15,000 |
| | (*iii*) exceeds 5,000 quintals | 25,000 |
| | (*b*) for bonafide industrial purpose in a factory as defined in the Factories Act, 1948; | 1,000 |
| | (*c*) for bona fide industrial purpose in any other industrial concern; | 1,000 |
| | (*d*) for bonafide scientific, agricultural, educational or medicinal purpose; | 1,000 |
| | (*e*) bonafide domestic use such as use for food or fodder for cattle by any other person; | 500 |
| 2. | The scale of fees in respect of licences for the sale of Mhowra flowers granted to a person for the purpose of sale— | |
| | (*a*) Licence for the sale of Mhowra Flowers granted to private persons when the total quantity permitted to be sold does not exceed 500 quintals. | 10,000 |
| | (*b*) Licence for the sale of Mhowra Flowers granted to a recognized body when the total quantity permitted to be sold annually– | |
| | (*i*) Does not exceed 500 quintals | 10,000 |
| | (*ii*) Exceeds 500 quintals | 10,000 plus Rs. 5 per quintal of the quantity sold in excess of 500 quintals." |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

**मोहफुलांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांचे सशक्तीकरण करण्यासाठी नेमलेल्या खारगे समितीच्या अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने, मोहाफुलांवर सद्य:स्थितीत महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ या कायद्यात असलेले निर्बंध शिथिल करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र. एमएफएल०२२१/प्र.क्र.२५/राउशु-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४.०५.२०२१

**संदर्भ :** १) मुंबई मोहाफुले नियम, १९५०
२) शासन परिपत्रक क्र. १०७७/२९पीआर दि. २९.१०१९७७
३) शासन अधिसूचना, गृह विभाग क्र.बीपीए-०७१६/प्र.क्र.१५०/राउशु-२, दि.१०.०४.२०१८
४) शासन अधिसूचना, गृह विभाग क्र.एमएफएल-०२२१/प्र.क्र.२५/राउशु-२, दि. ०३.०५.२०२१

**प्रस्तावना :-**

मोहफुलांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांचे सशक्तीकरण करण्यासाठी नेमलेल्या खारगे समितीने आपल्या अहवालात मोहाफुलांवर सद्य:स्थितीत महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ या कायद्यात असलेले निर्बंध कमी करण्याबाबत शिफारशी केलेल्या आहेत. सदर शिफारशींच्या अनुषंगाने मोहाफुलांवर सद्य:स्थितीत असलेले निर्बंध कमी करण्याच्या अनुषंगाने नियमात बदल करण्याबाबत संदर्भ ३ व ४ येथील अधिसूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. खारगे समितीच्या शिफारशीनुसार उक्त अधिसूचनेन्वये केलेली कार्यवाही व अनुषंगिक इतर बाबींच्या संदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

१) राज्यांतर्गत मोहाफुलांची खरेदी, गोळा करणे व वाहतुक यावरील निर्बंध उठविण्यात येत आहेत. मोहाफुले जमा करण्याचा नमुना एमएफ-३ परवाना, मोहाफुले खरेदी करण्याचा नमुना एमएफ-४ परवाना व मोहाफुले वाहतुकीचा नमुना एमएफ-५ परवाना बाबतच्या संदर्भ १ मधील तरतुदी रद्द करण्यात येत आहेत.

२) मोहाफुलांच्या परराज्यातून होणाऱ्या आयातीवर असलेले निर्बंध कायम ठेवण्यात येत आहेत.

३) मोहाफुलांच्या परराज्यातील निर्यातीचे धोरण खुले राहील. तथापि, त्यासाठी निर्यात परवाना मंजुर करून घेणे आवश्यक राहील. त्यामुळे नमुना एमएफ-७ मधील परवाना तसाच कायम ठेवण्यात येत आहे.

४) मोहाफुले साठवणूक, विक्री व व्यापार करण्याकरिता एमएफ-२ अनुज्ञप्ती नवीन मंजूर करण्यावर संदर्भ २ अन्वये शासनाने निर्बंध घातले आहेत. खाजगी व्यक्तीबाबत सदरचे निर्बंध कायम ठेवण्यात येत आहेत. तथापि, खाजगी व्यक्तींच्या नावे मंजूर असलेल्या नमुना एमएफ-२ अनुज्ञप्त्यांचा वार्षिक कोटा सिमित करण्यात येत आहे. या अनुज्ञप्तींच्या कोटयाची कमाल मर्यादा ही वार्षिक ५०० क्विंटल ठेवण्यात येत आहे. ज्या अनुज्ञप्तींचा कोटा सध्या वार्षिक ५०० क्विंटल पेक्षा जास्त आहे त्यांचा कोटा या मर्यादेपर्यंत कमी करण्यात यावा व ज्यांचा वार्षिक कोटा ५०० क्विंटल पेक्षा कमी आहे त्यांचा आहे तेवढाच कोटा ठेऊन त्यांच्या कोटयात यापुढे वाढ न करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे.

५) खारगे समितीच्या अहवालाच्या दृष्टीने आदिवासी विकास विभागाने मोहाफुले वापराकरिता नवनवीन योजना विकसित केल्यास मोहाफुलांच्या व्यापाराकरिता नमुना एफएफ-२ अनुज्ञप्ती मंजूर करणे आवश्यक राहील. अशा एमएफ-२ अनुज्ञप्ती हया केवळ आदिवासी क्षेत्रातील व आदिवासी सदस्य असलेल्या आदिवासी विकास संस्था, महिला बचत गट, सहकारी संस्था व ग्रामपंचायत अशा प्रकारच्या मुंबई मोहाफुले नियम, १९५० मधील नियम २ (सी) नुसार मान्यताप्राप्त संस्था (Recognised body) यांना नवीन एमएफ-२ अनुज्ञप्ती मंजूर करण्यात यावी.

६) अशा अनुज्ञप्त्या मंजूर करताना मोहाफुलांचा गैरवापर होऊ नये म्हणून संबंधित संस्थांकडून बंधपत्र घेण्यात यावे. जेणेकरुन त्यांच्या संस्थेकडून गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास यथास्थिती दंडात्मक कारवाई करणे, अनुज्ञप्ती रद्द करण्याची कार्यवाही सोबतच संबंधित संस्थेचे सक्षम प्राधिकारी हे फौजदारी कारवाईसाठी पात्र राहतील.

७) मोहाफुले बाळगणे, गोळा करणे व राज्यांतर्गत वाहतूक करणे यासाठीचे निर्बंध व परवाने काढून टाकल्याने मुंबई मोहाफुले नियम, १९५० च्या अनुषंगाने पारित करण्यात आलेले पुढील आदेश/नियम संपुष्टात येत असून याबाबत आवश्यक अधिसुचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

१. शासन अधिसूचना महसूल विभाग क्रमांक ५७३५/४९ दि.२७ जून,१९५० (मुंबई राजपत्र भाग चार -ब पान क्र.१४५०)

२. शासन अधिसूचना महसूल विभाग क्रमांक १०८००/४१ दि.११ डिसेंबर,१९५१

३. शासन अधिसूचना महसूल विभाग क्रमांक १०४८/४५ दि.१७ फेब्रुवारी,१९५३ (मुंबई राजपत्र भाग चार -ब पान क्र.३७०)

८) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२१०५०४१२५१३०५९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

YUVRAJ BAYAJI AJETRAO

Digitally signed by YUVRAJ BAYAJI AJETRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a34e563dd43e83b04db3eb31230d59c1af4b6e29ee6c1f13e338b0ccd51689af, pseudonym=E1E1D29BB9359A74AC2418FA3547E9C78ABC18E0, serialNumber=C01C962D08BD39997D4C4D6E7E19F8ACF340D1A5C4DD2B9A00977369607BBF82, cn=YUVRAJ BAYAJI AJETRAO
Date: 2021.05.04 13:00:36 +05'30'

**( यु. ब. अजेटराव )**

**उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

२. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई.

३. मा.मंत्री/राज्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.

४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२.

५. प्रधान सचिव (राउशु), गृह विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई - ३२.

६. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई -२३.

७. सर्व जिल्हाधिकारी

८. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.

९. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

१०. राउशु-२ (संग्रहार्थ).

3೭೦/4
(B/4)

Confidential

Immediate

No.MFL.1077/29-PR

Sub: Restrictions on the grant of M.F.II Licences.
Govt. of Maharashtra, Home Deptt.
office) Nagpur, dated 29th Oct.1977

C I R C U L A R

Government is pleased to direct that until further orders no new licences for the sale of Mhowra Flowers in form M.F.II. of the Bombay Mhowra Flowers Rules, 1950, should be granted by the Collectors.

2. However, if the Collectors after ascertaining the bonafide requirements of the Distt., is satisfied that it is also absolutely necessary to grant additional licence(s) then he may do so after obtaining the prior approval of the Government through the Commissioner of Prohibition and Excise, Maharashtra State, Bombay, after furnishing the detailed reasons and justifications with statistical data for the grant of such licence(s)

3. It has also been brought to the notice of Government that very large quantities of Mhowra Flowers have been permitted to be imported by the licence holders (M.F.II), inspite of the clear directions that passes for import of Mhowra Flowers may be granted after very careful scrutiny as to the purpose of import. It is, therefore, directed that the instructions, contained in para 401 of the Prohibition and Excise Manual, Volume IV, should be followed scrupulously and passes for import of Mhowra flowers should be sparingly granted after satisfying the bonafide requirements of the Distt. Whenever such import passes are issued, a statement showing the detailed partiqualars of all such import passes issued during amonth should be submitted to the Government and also to the Commissioner of Prohibition and Excise, Maharashtra State, Bombay.

4. A statement showing the names of existing licence holders of M.F.II with the quantity allowed to be sold during a year should be submitted to Government within a month from the date of receipt of this circular.

Sd/-
( S.R.Hegde )
**Section Officer, Home Deptt.,**
**Government of Maharashtra, Bombay.**

To,

1. The Commissioner of Prohibition and Excise, M.S.Bombay.

SUM/7.7.89